35

क्रमांक : न.भू.१/पुनर्विलोकन/२००१.

उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे यांचे कार्यालय.
शासकीय बंगला क्रमांक ८ येरवडा, जेलरोड,
येरवडा टेलीफोन भवन शेजारी, पुणे-६
पुणे, दिनांक :- १६-५-२००१.

प रि प त्र क :-

विषय :- पुनर्विलोकन काम .....

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, [महाराष्ट्र राज्य] पुणे यांनी त्यांचे कार्यालयांत दिनांक १९/४/२००१ रोजी उपसंचालक भूमि अभिलेख संवर्गातील अधिकाऱ्यांच्या घेतलेल्या सभेत परिरक्षण भूमापक / ज्या निमतानदारांकडे परिरक्षणाचे काम आहे, त्यांना प्रतिमहा २०० मिळकती ऐवजी १०० मिळकतीचे पुनर्विलोकन काम करणेकामी निर्देश दिलेले आहेत.

ज्या महात परिरक्षण भूमापक / निमतानदार हे वरील प्रमाणे दरमहा १०० मिळकतींचे पुनर्विलोकन कामाऐवजी नगर भूमापन हद्दीतील वापरात बदल झालेल्या मिळकती शोधून त्यावर बिनशेती सारा आकारणीचे काम करणार आहेत, त्याबाबत त्यांनी १०० मिळकतींचे प्रतिमहा काम करणेचे आहे. अशा वेळी त्यांनी दरमहा १०० मिळकतींचे शोधन मोहिमेचे काम करुन ज्या मिळकतींच्या वापरात बदल झाल्याचे आढळून आले असेल, तेवढया मिळकतीवर बिनशेती साऱ्याची आकारणी नियमानुसार करुन, त्याबाबतचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालय प्रमुखांचे मार्फत संबंधित सक्षम महसूल अधिकाऱ्यांकडे मंजूरीसाठी पाठविणेचे आहेत.

[कृ. मागे पहा]

ज्या महात परिरक्षण भूमापक / निमतानदार यांना कार्यालय प्रमुख १२ मोजणी प्रकरणाचे मोजणी काम देतील अगर ज्या प्रमाणात सदरचे मोजणी काम असेल त्या प्रमाणात त्यांना पुनर्विलोकनाचे मिळकतींच्या कामातून सूट मिळेल म्हणजेच १२ मोजणी प्रकरणाचे काम केल्यास संबंधीत परिरक्षण भूमापक / निमतानदार यांनी त्या महात पुनर्विलोकनाचे काम करणेचे नाही. तसेच ज्या महात ते ६ प्रकरणाचे मोजणी काम करतील त्याकामी त्यांना ५० मिळकतींच्या पुनर्विलोकन कामातून सूट मिळेल.

सदर परिपत्रकाची अंमलबजावणी मे, २००१ पासून होणेची आहे.

सही/- xxxxx
१६-५-२००१
[ पां. ग्री. कोरडे]
उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे.

प्रत :- सर्व अधीक्षक भूमि अभिलेख / तालुका निरीक्षक भूमि अभिलेख/ नगर भूमापन अधिकारी यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

" नि र्ग मि त "

[signature]
१८-५-२००१
कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमि अभिलेख,
पुणे प्रदेश, पुणे.

नालबंद/२००१.